International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.3 No.5 Nov – Dec 2022

भारतात सर्वप्रथम 'मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा'करणारे दूरदृष्टी असलेले राजे -"महाराजा सयाजीराव गायकवाड"

गीता बाबुराव ढाकणे
संशोधक विद्यार्थी, शंकरराव मोहिते महाविद्यालय,अकलूज,जि.सोलापूर
Corresponding Author- गीता बाबुराव ढाकणे
ई.मेल-geetadhakne2210@gmail.com

प्रस्तावना:-
'शेतकऱ्याचा मुलगा ते राजा' यापुढे जाऊन महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या विविध क्षेत्रातील सुधारणांमधून 'दूरदृष्टी असलेला समाजाभिमुख राजा' अशी महती निर्माण केली आहे. मध्ययुगीन काळातील पारंपरिक मानसिकतेत अडकलेल्या समाजावर प्रचलित आधुनिक दृष्टीने संस्कार करणे हे सरकारचे कर्तव्य आहे,असेत्यांचे मत होते.जागतिक पातळीवर भारताला स्थान मिळवायचे असेल तर काळाबरोबर चालावे लागेल या धारणेने त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातही आधुनिक दृष्टीने सुधारणा व कायदे केले. त्यांनी केलेले कायदे, विशेषतः 'प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे कायदा' हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीपेक्षाही प्रगत होता.

इतिहास:-
धर्मप्रसारासाठी म्हणून युरोपमध्ये प्रथम १५२४मध्ये मार्टिन ल्युथर यांनी सक्तीच्या शिक्षणाच्या कल्पनेचा विकास केला.१७१७ मध्ये प्रशियामध्ये सक्तीच्या शिक्षणाचा झालेला कायदा हा इतिहासातील पहिला आदर्श कायदा होय. भारतीय शिक्षण क्षेत्रात सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे ही संकल्पना पुढील चार टप्प्यांमध्ये विकसित झालेली पाहायला मिळते.

१.मुंबई इलाख्याचे सर्वेक्षण आयुक्त कॅप्टन विनगेट, गुजरात विभागाचे निरीक्षकटी.सी.होप यांनी सक्तीच्या शिक्षणाची शिफारस केली पण त्यावर ब्रिटिश सरकारने कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यातूनच प्रेरणा घेऊन दादाभाई नौरोजींनी १८८२मध्ये भारतीय शिक्षण आयोगापुढे हि कल्पना मांडली. पण अहवालात त्याचा उल्लेख ही करण्यात आला नाही.

२.बडोदा संस्थानाचे अधिपती महाराज सयाजीराव गायकवाड यांनी १८९३ मध्ये अमरेली विभागात सक्तीचे व मोफत शिक्षण केले. त्या यशामुळे प्रोत्साहित होऊन त्यांनी १९०६ मध्ये सर्व संस्थानात हा कायदा लागू केला. यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात २४ जुलै१९१७ रोजी हा कायदा लागू केला.

3.मुंबई महानगरपालिका विभागांमध्ये १९१८ मध्ये प्राथमिक शिक्षण कायदा करण्यात आला.त्यातही त्रुटी होत्या. कोठारी आयोगाने १९७५-७६पर्यंत प्राथमिक शाळेच्या पहिली ते पाचवी इयत्तांचे शिक्षण ६ते ११वर्षे वयाच्या मुलांना सक्तीचे करावे अशी शिफारस केली[१].भारत सरकारने ४ ऑगस्ट २००९च्या राजपत्रातRight of children tofree and compulsory education Act-2009अंतर्गत ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियम १ एप्रिल २०१० पासून सर्व भारतात (जम्मू कश्मीर सोडून) लागू केल्याचे नमूद केले.

पार्श्वभूमी:-
भारताच्या शैक्षणिक इतिहासात सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या शिक्षण विषयक सुधारणांचा गौरवपूर्ण उल्लेख केला गेला पाहिजे. या राजाने आयुष्यभर शिकण्याचे व इतरांना शिक्षण देण्याचे व्रत सुरू ठेवले. आधुनिक भारताच्या शैक्षणिक जडणघणीचे शिल्पकार असलेल्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी ज्ञानाचे प्रबोधन करत सर्व पिढीसाठी कल्याणकारक असा 'मोफत व सक्तीचे शिक्षण' कायदा केला.आपल्या एका हुकमात महाराज म्हणतात,"निराधार मनुष्यास मदत करण्याचे सरकारचे कर्तव्य आहे. या न्यायाने अज्ञानी मनुष्य ज्ञानी करण्याचेही कर्तव्य आहे. लोकसंख्येपैकी बऱ्याच भागाची अज्ञानाची स्थिती पाहता, देशाच्या अनिष्ट स्थितीत शिक्षण हीच संजीवनी आहे, अशी आमची खात्री झाली आहे. त्यामुळे सर्व रयतेस शिक्षण फुकट देण्याची व शिक्षण रयतेकडून सक्तीने घेवविण्याची योजना सरकारकडून करण्यात आली[२].

प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे कायदा:-
सन १८९३मध्ये मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात प्रायोगिक तत्त्वावर बडोदा राज्याच्या अमरेली विभागात सुरू करण्यात आली. अमरेली मध्ये मिळालेल्या यशानंतर हळूहळू संपूर्ण बडोदा राज्यात सन १९०६ मध्ये मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायदा मंजूर करण्यात आला भारतात सर्वप्रथम केलेला व अमलात आणलेला हा कायदा होय.महाराज फक्त कायदा करून थांबले नाहीत तर वेळोवेळी या कायद्याच्या अंमलबजावणीत येणाऱ्या

अडचणी समजावून घेऊन त्या दूर करून हा कायदा आणखीन मजबूत करण्याकडे पुरेपूर लक्ष दिले. पुढे शिक्षण आयोगाच्या शिफारशी प्रमाणे तसेच हुजूर आदेशानुसार,१९१०-११मध्ये सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा वाढवून ती मुलांसाठी १२वर्षे तर मुलींसाठी११ वर्षे करण्यात आली[३]. शिक्षण क्षेत्रातील सर्व गोष्टींवर महाराजांचे विशेष असे लक्ष होते. पाठ्यपुस्तकांची गुणवत्ता दर्जेदार पुस्तक निर्मिती शिक्षक गुणवत्ता यावर त्यांनी वेळोवेळी लक्ष देऊन त्यात सुधारणा केल्या. हरगोविंद दास यांना लिहिलेल्या एका पत्रात महाराज म्हणतात,"विद्यार्थ्यांच्या तरुण बुद्धीला कोड्यात टाकतील अश्या प्रकारच्या बाबींचा समावेश त्यांच्या पुस्तकात अजिबात नसावा.विज्ञानाचे सर्व धडे हे तांत्रिक व किचकट भाषेऐवजी साध्या,सोप्या व सरळ भाषेत असावे[४].

भारतातील उर्वरित भागातील लोकांच्या मनात मोफत आणि सक्तीच्या शिक्षणप्राप्तीचा विचार येण्याआधीच बडोद्यात तो अमलातही आणण्यात आला होता[५]सक्तीचेवमोफतप्राथमिकशिक्षणकायदाकरणारेबडोदाहे भारतातीलपहिलेसंस्थानआहेब्रिटिशभारतातहीहाकायदाअस्तित्वातनव्हताविशेषम्हणजेभारतातहाकायदालागूहोण्याआधी१०४वर्षेबडोद्यातीलप्रजेलासयाजीरावांनीयाकायद्याचा लाभकरूनदिला[६].

मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायद्यातील काही ठळक वैशिष्ट्ये:-

१) सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा संपूर्ण बडोदा राज्याला लागू करण्यात आलेला होता. कायद्याच्या कलम दोन नुसार काही अपवादात्मक परिस्थितीत महाराजा सयाजीराव गायकवाड एखाद्या विभागाला किंवा समुदायाला या कायद्यातून सूट देऊ शकत होते.

२) सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी कलम चार नुसार मुला मुलींसाठीचे वयोमर्यादा ७ ते १२ वर्षे अशी ठेवण्यात आली होती. कलम पाच नुसार निर्धारित केलेल्या वयातील मुला मुलींच्या पालकांवर आपल्या मुला मुलींना शाळेत पाठविण्याचे बंधन होते.

३)काही अपवादात्मक परिस्थितीत मुला-मुलींना शाळेत गैरहजर राहण्याची परवानगी देण्यात आली होती.४) सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानुसार वार्षिक परीक्षेच्या एक महिना अगोदर गावातील महसूल अधिकारी शाळेतील शिक्षकांच्या मदतीने शाळायोग्य वयाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींची जनगणना करत असत आणि कलम 8 अन्वये यादी प्रसिद्ध केली जात असे.

५)यादी प्रसिद्ध झाल्यापासून 30 दिवसाच्या आत ज्या पालकांना यादीमध्ये दुरुस्ती संबंधी किंवा कायद्यातून सवलत मिळण्यासंबंधी अर्ज करावयाच्या असतील ते तसे अर्ज सादर करू शकत असत.

६)ज्या पालकांच्या मुला मुलींची नावे यादीमध्ये आहेत आणि ज्यांना कोणत्याही प्रकारचे सुट तरतुदी नुसार मिळाली नाही अशा पालकांची यादी प्रसिद्ध झाल्यापासून 30 दिवसाच्या आत मुला मुलींना शाळेत पाठवणे बंधनकारक होते.

७) कलम १२ नुसार मुख्याध्यापकांनी यादीत नाव असलेल्या मात्र शाळेत दाखल न झालेल्या मुला मुलींचा अहवाल दर महिन्याला सरकारला सादर करणे बंधनकारक असेल.

८)मुख्याध्यापकांकडून मिळालेल्या नावानुसार ग्रामपंचायत तहसील आणि जिल्ह्याच्या ठिकाणी मामलेदार संबंधित पालकांना नोटीस पाठवत असत

९)कलम 13 नुसार जोपर्यंत पालक मुलांना शाळेत पाठवत नाहीत तोपर्यंत प्रत्येक महिन्याला दंड आकारण्याची तरतूद केली होती. प्रत्येक विद्यार्थी महिन्यात कामाच्या एकूण दिवसा पैकी दोन तृतीयांश इतके दिवस शाळेत हजर असणे अनिवार्य होते.

१०)सक्तीच्या प्राथमिक शिक्षण व शिक्षणाच्या वयातील विद्यार्थ्यांना कामावर ठेवणाऱ्या मालकांवर सुद्धा गुन्हा दाखल करण्याची तरतूद या कायद्यानुसार करण्यात आलेली होती.

११)जमा झालेली दंडाची रक्कम ही फक्त शिक्षणासाठी खर्च करण्यात येण्याची तरतूदही कायद्यानुसार केलेली होती[७].

वरील वैशिष्ट्ये लक्षात घेता,प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाच्या इमारतीचा मुख्य पाया आहे आणि तो जास्त मजबूत असला पाहिजे या दृष्टीने महाराजांनी अधिकाधिक लक्ष व निधी हा प्राथमिक शिक्षणासाठी उपयोगात आणला. बडोद्यात शिक्षणावर प्रतिव्यक्ती सात आणा इतकी रक्कम खर्च केली जात असे तर ब्रिटिश इंडियात हेच प्रमाण एक आणा इतके होते[८]महाराजांच्या या सर्व प्रयत्नांचा भाग म्हणून भारतातील इतर कोणत्याही राज्यापेक्षा बडोद्यात एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात शाळेत जाणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त होते.

समारोप:-

प्राथमिक शिक्षणाची व्याप्ती वाढावी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचावे म्हणून महाराजांनी अतिशय दूरदृष्टीने शिक्षण विषयक विचार मांडले होते.महाराज म्हणतात की,"शाळा ही गावातल्या प्रत्येक उपक्रमाचे केंद्रबिंदू झाली पाहिजे,तसेच ग्राम जीवनातील तो एक महत्त्वाचा भाग झाला पाहिजे" सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत सर्वात जास्त लक्ष शिक्षण खाते सक्षम करण्यावर दिले,त्यातही प्राथमिक शिक्षणावर विशेष भर दिला. प्रत्येकाला त्याच्या गरजेनुरूप शिक्षण घेता यावे या दृष्टीने शिक्षण यंत्रणेचे नियोजन त्यांनी केले होते.

भारत सरकारने२००९मध्ये याच 'समता' या मुद्द्यावर भर दिला,जे महाराजांनी शंभर वर्षांपूर्वीच केले होते.त्यांनी जगातल्या कोणत्याही शिक्षण व्यवस्थेचे अंधानुकरण केले नाही.आपल्यासमोर असलेल्या समाजाला,समाजातील व्यक्तींना.जे साजेल, रुचेल अशी शिक्षण व्यवस्था देण्याचा प्रयत्न महाराजांनी सतत केला.भारतातील बडोदा हे मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करणारे पहिले राज्य होते,यावरून महाराजांच्या दूरदृष्टीची प्रचिती येते महाराज केवळ मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा कायदा करून थांबले नाहीत तर काळाबरोबर त्यामध्ये सतत परिवर्तन व बदल करण्यावरही भर दिला.विविध चौकशी समित्या नेमून त्यांच्या शिफारशीनुसार तसेच बदलत जाणाऱ्या काळानुसार त्यांनी योग्य ते बदल शिक्षण व्यवस्थेत केले . त्यांच्या या सर्व प्रयत्नांचा भाग म्हणून बडोदा संस्थानात शिक्षणाचे व एकूण स्त्री शिक्षणाचे प्रमाण भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक राहिले.

संदर्भ:–

१) Naik J.P.,Elementary Education In India, Bombay, 1965

२) संपादित बाबा भांड, सयाजीराव गायकवाड निवडक कायदे अर्थात हुजूर हुकूम, साकेत प्रकाशन,२०१९,पृ.४५

३) डॉ. तायडे विशाल,महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा शिक्षण भाग एक, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती ,औरंगाबाद, २०२०,पृ.५०

४) संपादक डॉ.पगार एकनाथ, महाराजा सयाजीराव गायकवाड पत्रसंग्रह: भाग 3,महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती,औरंगाबाद,२०१७,पृ.४१५-४१६

५) हिंगुराव मंदा, महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण,साकेत प्रकाशन,औरंगाबाद, २०१५

६) पाटीलदिनेश, महाराजासयाजीरावयांच्यासुधारणा-धर्मआणिसामाजिक-

भाग७,महाराजासयाजीरावगायकवाडचरित्रसाधनेप्रकाशन समिती, औरंगाबाद२०२०, पृ.१४५

७) डॉ. तायडेविशाल,उक्त, पृ.४६-४७

८) डॉ. तायडे विशाल,उक्त, पृ.४६-४७

९) डॉ.मगर राजेंद्र, प्रज्ञावंत महाराजा सयाजीराव भाग चार,महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद ,२०२०

१०) भांड बाबा, सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड 1, साकेत प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, २०१३

११) डॉ.मगर राजेंद्र, सयाजीरावांचे जागतिक वेगळेपण लेखसंग्रह,महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद,२०२०